**SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY AMRAVATI'S**

**SHRI SHIVAJI ARTS, COMMERCE AND SCIENCE MAHAVIDYALAYA, MOTALA DIST.BULDANA**

**DEPARTMENT OF MARATHI**

**&**

**INTERNAL COMPLAINT COMMITTEE**

**ACADEMIC YEAR- 2022 – 2023**

**राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव व स्वामी विवेकानंद जयंती**

**12/01/2023**

---

# Report

श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्याकरिता विविध प्रकारचे सामाजिक, शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्याच अनुषंगाने राष्ट्रमाता माँ साहेब जिजाऊंचे ऐतिहासिक कार्य व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांचे कार्य विद्यार्थ्यांना कळावे या हेतूने सुप्रसिध्द लेखक, कवी, शायर व प्रख्यात सूत्रसंचालक अजीम नवाज राही यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. गजानन जाधव सर होते. प्रमुख वक्ते म्हणून सुप्रसिध्द लेखक, कवी, शायर मा. श्री अजीम नवाज राही हे उपस्थित होते. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्रमुख वक्ते मा. श्री अजीम नवाज राही यांनी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या ऐतिहासिक कार्याविषयी माहिती दिली. माता केवळ प्रेमळ नसून ती शक्ति असू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे स्वराज्य संकल्पिका माँ साहेब जिजाऊ आहेत. राजमाता जिजाऊ यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शिवाजी महाराजांना घडविले स्वराज्याच्या संकल्पनेची बीजे त्यांच्या मनात पेरली.

अध्यक्षीय भाषणातून मा. प्राचार्य डॉ. गजानन जाधव यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्याला उजाळा दिला. यावेळी मा. ॲड. दीपक पाटील साहेब आजीवन सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, मा. कुलेश देशमुख साहेब, डॉ. शरद काळे, डॉ. सौ. छाया महाजन उपस्थित होते.

प्रेस क्लबचे अध्यक्ष गणेश पाटील, पत्रकार रहीम शहा, राधेश्याम राठोड, गणेश झंवर, पप्पू राठी, नंदकिशोर कुकडे, इ. पत्रकार तसेच सामाजिक कार्यकर्ते वऱ्हाडी कवी श्री तुळशिराम मापारी इ. ची उपस्थिती कार्यक्रमाला लाभली होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनील मामलकर सरांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. सौ. नंदा मास्कर यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. चित्रा मोरे तसेच आभार प्रा. पुरुषोत्तम चाटे यांनी मानले.

कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी – विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






लोकमत

# माँसाहेब जिजाऊ यांनी पेरली स्वराज्याच्या संकल्पनेची बीजे - अजीम नवाज राही

लोकमत न्यूज नेटवर्क

**मोताळा :** माता केवळ मायाळू नसून ती शक्ती असू शकते याचे सर्वांत मोठे उदाहरण म्हणजे राष्ट्रमाता राजमाता माँसाहेब जिजाऊ. राजमाता जिजाऊ यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांना घडविले. स्वराज्याच्या संकल्पनेची बीजे याच जिजाऊंनी पेरली, असे प्रतिपादन प्रख्यात निवेदक, गझलकार, साहित्यिक अजीम नवाज राही यांनी केले. स्थानिक शिवाजी महाविद्यालयामध्ये माँसाहेब जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.



शिवाजी महाविद्यालयामध्ये मार्गदर्शन करताना अजीम नवाज राही.

सुनील मामलकर यांनी केले तर मान्यवरांचा परिचय प्रा. नंदा मास्कर यांनी करून दिला.

सूत्रसंचालन प्रा. डॉ. चित्रा मोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. पुरुषोत्तम

यावेळी दीपक पाटील, कुलेश देशमुख, डॉ. छाया महाजन, डॉ. शरद काळे, तुळशीराम मापारी आदींसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी तसेच पत्रकार

Hello Buldhana
Page No. 2 Jan 14, 2023
Powered by: erelego.com